# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य / State: महाराष्ट्र  जिल्हा / District: मुंबई  पोलीस ठाणे / Police Station: ला.प्र.वि. मुंबई  पहिली खबर क्र. / FIR No.: १६  वर्ष / Year: २०२६  दिनांक / Date: १६/०६/२०२६

2. (i) अधिनियम Act: भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम  कलमे Sections: ७(अ) १२
   (ii) अधिनियम Act ............ कलमे Sections ............
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ............

3. (a) अपराधाची घटना : / Occurrence of offence : वार / Day: सोमवार  तारीख पासून / Date from: १५/६/२६  वेळ / Time: ............  तारीख पर्यंत / Date to: १५/६/२६  वेळ / Time: १६:१०

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.००  (2) ०३.०० ते ०६.००  (3) ०६.०० ते ०९.००  (4) ०९.०० ते १२.००  (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.००  (7) १८.०० ते २१.००  (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची / Information received at P. S.  तारीख / Date: १५/०६/२०२६  वेळ / Time: १२:००

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. / General Diary Reference : Entry No.: ०९  तारीख / Date: १६/०६/२०२६  वेळ / Time: ०३:३०

4. माहितीचा प्रकार Type of Information: लेखी  लेखी / तोंडी Written / Oral: लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा / Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ............  चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. / Chouki / Beat / O. P. Name and No. ............

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव / Address of Occurrence Name ............ ठिकाणाचे नंबर / No. if any ............ गल्ली / Ward ............ रस्त्याचे नाव / Name of road ............
RTO कार्यालय अंधेरी पश्चिम परिसर
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण / Nearest identifiable place ............ गाव / Village ............ पोस्ट / Post ............ तालुका / Taluka ............ जिल्हा / Dist. ............ राज्य / State ............

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव / In case, outside the limit of this Police Station ............ तालुका / Taluka ............ जिल्हा / Dist. ............ राज्य / State ............

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव / Name: जगदिश वसंत मोरे  (b) वडिलांचे / पतीचे नाव / Father's / Husband's Name: वसंत मोरे
(c) जन्म तारीख व वय / Date of Birth and Age: ३६ वर्षे  (d) राष्ट्रीयत्व / Nationality: भारतीय  फोन नं. / Phone No.: ९६६६८९०३
(e) पारपत्र क्रमांक / Passport No. ............ दिल्याचा दिनांक / Date of issue ............ दिल्याचे ठिकाण / Place of Issue ............ (f) व्यवसाय / Occupation ............
(g) धर्म Religion: हिंदू  जात Caste: मराठा  जनजात Sub-Caste ............
(h) पत्ता / Address ............ गल्ली/सर्व्हे नं. / Ward ............ घर/नाव नं. / House Name No. ............ फोन/मो. नं. / Phone No. ............ पॅन नं. / Pan No. ............ वोटर्स नं. / Card No. ............
पद - पोलीस निरीक्षक, नेमणूक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
रस्त्याचे नाव / Road ............ जवळचे प्रसिद्ध ठिकाण / Nearest identifiable place ............ गाव / Village ............ पोस्ट / Post ............ पो. स्टे. / P. Stn. ............
तालुका / Taluka ............ जिल्हा / Dist. ............ राज्य / State ............ सध्याचा पत्ता / Present Address ............

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा. ) ( संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे. )

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

① मुस्तफा नुरमोहमद शेलोट, वय ४८ वर्षे, रा.ठी. रूम नं. A/303, उर्मिमाला हौसो. प्लॉट नं. 148 LBS मार्ग, कोहिनूर हॉस्पीटल समोर, कुर्ला वेस्ट, मुंबई ४०००७०
② राजेंद्रप्रसाद रमाशंकर बिंद, वय ४५ वर्षे रा.ठी. रूम नं. ६८, शिवसाई रहिवासी संघ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, VTC बांद्रा पुर्व, मुंबई ४०००५१

(G.C.P.) K 1043 (A) (1000–1-2025)

Scanned with OKEN Scanner

मि. जगदिश वसंत मोरे, वय ३८ वर्षे, पद- पोलीस निरीक्षक नेमणुक - लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई, असुन माझी सविस्तर फिर्याद स्वतंत्र पानावर टंकलिखीत करण्यात आली असुन तिच फिर्याद गुन्ह्याची प्रथम खबरी अहवाल म्हणुन संबोधण्यात यावी,

(signature)

समक्ष

(signature)

(हरिदास खिलेदार)

सहायक पोलीस आयुक्त

ला. प्र. वि. मुंबई

Scanned with OKEN Scanner

फिर्याद दिनांक १६ /०६/२०२६

मी, जगदीश वसंत मोरे, वय ३६ वर्षे, व्यवसाय : नोकरी (पोलीस निरीक्षक), नेमणुक - लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई, मोबाईल नंबर ९७६७७८१०३३.

----------

मी वरील प्रमाणे असून, दिनाक ०४/०९/२०२५ पासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे पोलीस निरीक्षक या पदावर नेमणुकीस आहे.

मी दिनांक ११/०६/२०२६ रोजी कार्यालयात कर्तव्यावर हजर असताना, मा. अपर पोलीस आयुक्त, ला.प्र.वि. मुंबई यांचेकडील पडताळणी कारवाई क्रमांक ४१/२०२६ मध्ये तपासी अधिकारी म्हणून माझी व पर्यवेक्षण अधिकारी म्हणुन सहायक पोलीस आयुक्त, श्री.हरिदास किल्लेदार यांची नेमणुक केल्याबाबत आदेश मिळाल्याने नमुद पडताळणी मधील तक्रारदार मोहम्मद आलमगिर अन्सारी यांचेकडे त्यांच्या लेखी तक्रारीच्या अनुषंगाने चर्चा केली. तेव्हा तक्रारदार मोहम्मद आलम गिर अन्सारी,वय ५५, रा ठी. रुम क्र.४०२,लक्ष्मी निवास बंगला,चंदनसार रोड,विरार पूर्व,पालघर -४१०३०५ . मोबाईल. ७७५६०७०७२७ हे ऑटोरिक्षा चालवत असून दि. २४/११/२०२३ रोजी मिरा रोड येथे ट्रॅफिक पोलिसांनी इन्शुरन्स संपल्याबद्दल तक्रारदार यांना दंड आकारून लायसन्स क्र.एम एच ०२.१९९९००३९८५१ जप्त केले होते. त्यांना आकारलेल्या दंड भरुन लायसन्स सोडवण्यासाठी आरटीओ अंधेरीला गेले असता एजंट मुस्तफा यांनी तक्रारदार यांना लायसन्स ब्लॉक असल्याचे सांगून ट्राफिक पोलिस चौकी येथे जाउन दंड भरण्यास सांगितला. तक्रारदाराने दिनांक १०/०६/२०२६ रोजी काशिमीरा ट्राफिक पोलिस चौकीत ५५०/- दंड भरला व चौकीमार्फतीने लायसन्सवर कोणताही दंड पेंडिंग नसल्याचे तक्रारदारास लेखी पत्र दिले. सदर पत्र घेवून तक्रारदार हे आरटीओ अंधेरी कार्यालयात गेले असता, आरटीओ कर्मचारी यांनी सदर पत्र स्विकारले नाही. एजंट मुस्तफा याने आरटीओ येथील एजंट मुस्तफा यांच्याशी वार्तालाप करून तक्रारदार यांच्याकडे लायसन्स ब्लॉक काढण्यासाठी रु ४०००/- व लायसन्स रिनीवल करण्यासाठी रु ५५००/-लाच रकमेची मागणी केली. तक्रारदार यांनी अतिरीक्त मागितलेल्या रकमेबाबत विचारना केली असता, एजंट मुस्तफा याने त्यांना पण आरटीओ येथील अधिकारी यांना पैसे दयावे लागतात असे सांगितले.तक्रारदारास लाच देण्याची इच्छा नसून एजंटाविरुध्द कायदेशीर कारवाई व्हावी म्हणून त्यानी दिनांक ११/०६/२०२६ रोजी ला.प्र.वि.,मुंबई येथे लेखी तक्रार दिली.

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने पुढील पडताळणी कारवाईकरीता दोन शासकीय पंच नामे १) श्री. सुजित सबाजी मोरे, वय -३९, व्यवसाय - नोकरी, सहाय्यक,म्हाडा प्राधिकरण कार्यालय, कलानगर, बांद्रा, मुंबई व २) श्रीमती.सायली विलासराव मोरे,वय-३२,व्यवसाय - रेशनिंग इन्सपेक्टर, शिधावाटप कार्यालय, विक्रोळी, मुंबई कार्यालय यांना उपलब्ध केले.

तक्रारदार मोहमद अन्सारी यांचे तक्रारीस अनुसरुन दिनांक १२/०६/२०२६ रोजी पडताळणी कारवाईचे नियोजन केले. मी ,तक्रारदार व दोन्ही पंच यांना घेवून कार्यालयातील पहिल्या मजल्यातील तांत्रिक शाखेत गेलो व तेथील टेक्नीशीयन पो.ह. सुनिल रावराणे यांच्या मदतीने व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मायक्रो एस.डी.कार्ड टाकुन माझे, तक्रारदार व दोन्ही पंच यांचे वक्तव्य ध्वनिमुद्रीत केले. त्यानंतर ११.५८ वा. व्हाईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार मोहम्मद आलम गिर अन्सारी यांना त्यांचे मोबाईल न. ७७५६०७०७२७ यावरून आरटीओ एजंट मुश्तफा यांचे मोबाईल न.९८९२४१३२५१ यावर फोन करून फोन स्पीकर ठेवण्यास सांगितले. तक्रारदार मोहम्मद आलम गिर अन्सारी यांनी एजंटला फोन लावुन कोठे भेटावयास यायचे याबाबत विचारणा केली असता एजंट मुस्तफा याने तक्रारदारास विचारणा केली कि, 'तुम कहा गये थे, पोलीस वाले आये थे, आपसे बात कि, क्या बात कि ये बताओ असे विचारुन पुलीसवाले को लेके मेरे पास मत आना' असे सांगितले. तेव्हा तक्रारदाराने 'कोई पुलीस वाले मेरे पास नही आये' असे उत्तर दिले असता एजंट मुस्तफाने आरटीओ अंधेरी कार्यालय येथे तक्रारदार यांना येण्यास सांगितले. सदरचे कॉलवरील संभाषण हे मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये पंचासमक्ष पोह. रावराणे यांच्या मदतीने ध्वनीमुद्रीत केले आहे.

Scanned with OKEN Scanner

फिर्यादी पोलीस निरीक्षक जगदीश मोरे यांचा फिर्यादी जबाब पुढे चालु....

त्यानंतर आम्ही दिनांक १२/०६/२०२६ रोजी लाप्रवि कार्यालयातून पडताळणी कारवाईकरीता बाहेर पडलो.पडताळणी पंचनामा कामी मी,सपोआ हरिदास किल्लेदार,पचं क्र १ व पंच क्र २, पोहक्र. ०३.१२००/ रावराणे,तक्रारदार व इतर सापळा पथक असे शासकीय वाहनासह रवाना होवून किआ कार सर्व्हिस,शाह इंडस्ट्रीअल रोड,वि.रा.देसाई रोड,अंधेरी,पश्चिम मुंबई येथे पोहचलो.

तदनंतर तक्रारदार यांनी परिधान केलेल्या कुरताच्या आतील बाजुस व्हॉईस रेकॉर्डर लावून एजंट यांची ठरलेल्या ठिकाणी भेट घेण्यासाठी तक्रारदार यांना पंच श्री सुजित मोरे यांचेसह जाण्यास सांगितले व मी व्हॉईस रेकॉर्डर चालू केला.त्यावेळी वेळ १४:१३ होती. सदर सुचनेवरुन तक्रारदार व पंच मोरे,हे सदर ठिकाणावरुन चालत रवाना झाले.

काही वेळाने १४:४४ वा तक्रारदार , पंच श्री.मोरे हे परत शासकीय वाहनात येवुन बसले. मी , पंच नं.२यांचे समक्ष पंच न.०१ श्री सुजित मोरे व तक्रारदार यांना सदर ठिकाणी 'काय घडले' याबाबत विचारणा केली असता,तक्रारदार यांनी सांगितले कि, तक्रारदार व पंच असे आरटीओ कार्यालय,अंधेरी पश्चिम,मुंबई येथे गेले.सदरवेळी पंच क्र.०१ मोरे यांनी तक्रारदार हे एजंट यांच्याशी बोलत असल्याचे पाहिले. तक्रारदार यांनी एजंट यास 'लायसन का ब्लॉक खोलने के लिये कितना पैसा लगेगा' असे विचारले असता, एजंट मुस्तफा याने तक्रारदारास सांगितले कि, 'लायसन्सके ब्लॉक खोलने के लिए ४००० रू खर्चा आयेगा, ब्लॉक ओपन करने के लिए साहाब का साईन लेंगे और रिनीवल का अलग से खर्चा आयेगा' असे सांगितले. सदरबाबत तक्रारदार यांनी एजंट यास लोकसेवकाचे यात किती याबाबत विचारले असता, एजंट मुस्तफा याने उडवाउडवीचे उत्तरे दिले व आता लंच टाईम झाला असून थोडया वेळाने येण्यास सांगितले.सदरचे तक्रारदार व एजंट मुस्तफा यांच्यातील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण मी,सपोआ किल्लेदार पचांनी ऐकले व पुनश्चः पडताळणी कारवाई करण्याचा निर्णय घेतला.

काही वेळाने तक्रारदार यांनी परिधान केलेल्या कुरत्याच्या आतील बाजुस व्हाईस रेकॉर्डर लावून एजंट यांची ठरलेल्या ठिकाणी भेट घेण्यासाठी तक्रारदार यांना पंच श्री सुजित मोरे यांचेसह जाण्यास सांगितले व मी व्हॉईस रेकॉर्डर चालू केला.त्यावेळी वेळ १५:५३ वा. होती. सदर सुचनेवरुन तक्रारदार व पंच मोरे,हे सदर ठिकाणावरुन रवाना झाले.

काही वेळाने तक्रारदार , पंच श्री.मोरे हे परत शासकीय वाहनात येवुन बसले. मी पंच नं.२ यांचे समक्ष पंच न.०१ श्री सुजित मोरे व तक्रारदार यांना सदर ठिकाणी 'काय घडले' याबाबत विचारणा केली असता,तक्रारदार यांनी सांगितले कि,एजंट मुस्तफा याने तक्रारदार यांना सांगितले कि, 'साहाब से बात हुई है, वो क्या बोला के उनको मंडे को बुलाओ'. तेव्हा तक्रारदार यांनी 'पैसा वैसा कुछ कम कराओ' असी विनंती केली असता एजंट मुस्तफा यांनी तक्रारदारास सांगितले कि, '४००० रू लगेगा ब्लॉक खोलने का, पांचसौ रूपये कम देना, मै उसमे से पाचसौ कम करा लुंगा'. लायसन्सचे ब्लॉक खोलण्यासाठी तक्रारदार यांना तडजोडीअंती ३५००/- इतक्या लाच रकमेची मागणी केल्याचे पडताळणी मध्ये निष्पन्न झाले.

पडताळणी कारवाईमध्ये आरटीओ एजंट मुस्तफा याने लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने दिनांक १५/०६/२०२६ रोजी आम्ही सापळा पथक,तक्रारदार, दोन्ही पंच असे लाप्रवि कार्यालयात सापळा कारवाई कामी हजर झालो. दिनांक १५/०६/२०२६ रोजीच्या सापळा कारवाईमध्ये नविन मेमरी कार्ड वापरण्यात येणार असल्याने मी पोह रावराणे यांना सांगुन नविन मेमरी कार्ड हजर करण्यास सांगितले. त्यानंतर मी, सपोआ किल्लेदार, दोन्ही पंच, तक्रारदार व पथकातील अंमलदार सापळा कारवाईकरीता आवश्यक त्या साधन सामुग्रीसह दोन शासकिय वाहनाने ११:२० वा. लाप्रवि कार्यालयातून बाहेर पडलो. मी शासकीय वाहन चालक स.पोउनि ३३९८६/ फटांगरे व वाहन चालक पोशि क्र. १३०४७१/साळुंखे यांना दोन्ही वाहने किआ कार सर्व्हिस,शाह इंडस्ट्रीअल रोड,वि.रा.देसाई रोड,अंधेरी,पश्चिम मुंबई येथे घेण्यास सांगितली. १२.३० वा. आम्ही सर्व शाह इंडस्ट्रीअल रोड,वि.रा.देसाई रोड,अंधेरी,पश्चिम,मुंबई येथे आलो.

वेळे अभावी सदर ठिकाणी शासकीय वाहनातच माझे, पंचांचे व तक्रारदार यांचे सापळा पुर्व कारवाई बाबतचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत करण्यात आले. मी व स.पो.आ.हरिदास किल्लेदार यांनी पंच, तक्रारदार व

समक्ष,
(हरिदास किल्लेदार)
सहायक पोलीस आयुक्त
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner

पथकास सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाची दक्षता व करावयाची कारवाईबाबत आवश्यक त्या सुचना दिल्या. मी तक्रारदार यांना एजंट मुस्तफा यांस लाचेची रक्कम दिल्यानंतर इशारा म्हणून सापळा पथकास दिसेल अशाप्रकारे चष्मा काढून रूमालाने चष्मा पुसणे हि कृती करण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना लाचेच्या रक्कमे बाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी त्यांचेकडील बचतीतील रूपये ३५००/- इतकी रक्कम घेवुन आल्याचे सांगितले. तक्रारदार यांचेकडील उपलब्ध लाचेची रक्कम रू. ३५००/- (त्यामध्ये रू. ५००/- दराच्या भारतीय चलनाच्या ०६ नोटा व १००/- दराच्या पाच चलनी नोटा वापरण्यात आल्या आहेत.) यांच्या फोटो घेवून पीडीएफ करण्यात आली. त्यानंतर सपोउनि चा.क्र.३३९८६/फटांगरे यांनी पंच व तक्रारदार यांना ॲन्थ्रोसिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून ॲन्थ्रोसिन पावडरचा डेमो दाखविला त्यामध्ये पावडरचा रंग फिकट निळसर चकाकी दिसून आली.त्यानंतर सपोउनि फटांगरे हे शासकीय वाहन चालक असल्याने,सापळा कारवाईमध्ये भाग घेणार नसल्याने त्यांना वाहनात बसून राहण्यास सांगितले.स.पोउनि.चा.फटांगरे यांनी लाच म्हणून वापरण्यात येणाऱ्या रुपये ३५००/- रक्कमेतील नोटांना ॲन्थ्रोसिन पावडर लावून ती लाचेची रक्कम तक्रारदार यांनी परिधान केलेल्या कुरत्याच्या उजव्या बाजूच्या खिशामध्ये ठेवली.

तदनंतर तक्रारदार यांनी परिधान केलेल्या कुडत्याच्या आतील व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच श्री सुजित मोरे व इतर पोलीस अमलदार यांचेसह एजंट मुस्तफा यांची ठरलेल्या ठिकाणी भेट घेण्यासाठी जाण्यास सांगितले व मी व्हॉईस रेकॉर्डर चालू केला. त्यावेळी वेळ १३:२० होती. सदर सुचनेवरून तक्रारदार व पंच न. ०१ सुजित मोरे,व आम्ही सापळा पथक सदर ठिकाणावरून रवाना झाले.त्यानंतर आम्ही सापळा पथक अंधेरी आरटीओ कार्यालय मुख्य दरवाजा ,पहिला माळा,तसेच तळमजला येथे येवून परिसरात पाळत ठेवून होतो.

तदनंतर तक्रारदार हे पंचासमक्ष एजंट मुस्तफा यांना आरटीओ अंधेरी कार्यालय पहिला माळा येथे भेटण्यास गेले. सदर ठिकाणी एजंट मुस्तफा हे पहिला माळा,अंधेरी आरटीओ कार्यालय येथे उपस्थित होते. एजंट मुस्तफा हे तक्रारदार यांना आरटीओ कार्यालय, खिडकी क्र.१३ जवळ घेवून गेले.तेथील आरटीओ कर्मचारी यांनी तक्रारदार यांच्याकडे त्यांची माहिती भरलेले फॉर्म व कागदपत्रे ताब्यात दिली.एजंट मुस्तफा याने तक्रारदार यांना पहिल्या मजल्यावर जाउन साहेबांची सही घेण्यास सांगितली.तक्रारदार यांच्याकडे असलेल्या कागदपत्रांवर आरटीओ येथील साहेब यांची सही झाल्यावर मुस्तफा याने तक्रारदार यांना सदर कागदपत्रांची छायांकित प्रती काढण्यास सांगितले.कागदपत्रांच्या छायांकित प्रती घेवून आल्यावर तक्रारदार यांना आरटीओ कार्यालया पहिला माळयावर बसून राहण्यास सांगितले.काही वेळाने एजंट मुस्तफा याचे परिचयाचा सोबत काम करणारा एक अनोळखी इसम तक्रारदार यांच्याजवळ येवून त्यांना आरटीओ कार्यालयातील कॅंटिन बाहेरील परिसर येथे घेवून गेले. एजंट मुस्तफा याने तक्रारदार यांना ''बाहर जाव, गेट के बाहर. इसको पैसा दो. साडेतीन हजार रूपया. आप जाव घर पे. मै ये ओपन के लिये डालता हु. पंधरा दिन मे ब्लॉक, ब्लॉक खुल जायेगा. तो बाहर दो, बाहर गेट के पास पैसा लेना और इनको बाहर से रवाना कर. जाव. पुलिसवाले आये हुये है. जाव. इसको देदो पैसा. जा''. असे तक्रारदारास व सोबतच्या दुसरे एजंट यास सांगितले व एजंट मुस्तफा निघून गेला. दुसरा एजंट हा तक्रारदार यांना आरटीओ कार्यालय बाहेरील फुटपाथवर उजव्या बाजूस छत्रीखाली टेबल लावुन काही व्यक्ती काम करत असलेल्या ठिकाणी घेवून गेला व तक्रारदार यांच्याकडुन लाचेची रक्कम स्विकारली. त्यानंतर तक्रारदाराने सापळा पथकास दिसेल अशाप्रकारे एजंट मुस्तफा याच्या परिचयाच्या/सोबत काम करत असलेल्या दुसरे एजंटने लाचेची रक्कम स्विकारल्याबाबत पुर्व नियोजीत डोळयावरील चष्मा काढुन रूमालाने साफ करण्याचा इशारा केला. त्यानंतर लगेच सपोआ किल्लेदार यांनी तक्रारदार यांचे शर्टास आत लावलेला रेकॉर्डर बंद करून, सापळा पथकास इशारा करून पंचासमक्ष आरटीओ एजंट २ यास १६.१० वा. लाचेच्या रक्कमेसह रंगेहाथ पकडले. सदर खाजगी इसमास त्याचे पूर्ण नाव व पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव श्री. राजेद्रप्रसाद रमाशंकर बिंद, वय- ४७ वर्षे,धंदा- लायन्सस एजंट,पत्ता- खोली - ६८,आंबेडकर नगर, शिवशाही सेवा संघ चाळ, बांद्रा (प),मुंबई असे सांगितले. तेव्हा सपोआ किल्लेदार यांनी राजेंद्रप्रसाद बिंद यास एजंट मुस्तफा यांना फोन करून पैसे दिले बाबत कळविण्यास सांगितले असता राजेंद्रप्रसाद यांनी मुस्तफा यांस फोन करून मुस्तफा

Scanned with OKEN Scanner

भाई वो चाचा ने पैसे दिये है', असे सांगितले.तेव्हा एजंट मुस्तफा यांनी "हा" असा प्रतिसाद दिला असता लागलीच माझेसोबत असलेल्या सापळा पथकाचे दुसरे टिमने एजंट मुस्तफा यांना आरटीओ गेट समोर ताब्यात घेतले.मुस्तफा यास त्याचे पूर्ण नाव व पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव श्री.मुस्तफा नुरमोहम्मद शेलॉट, वय - ४८, व्यवसाय- आर.टी.ओ.एजंट/अंधेरी परिवहन कार्यालय, मुंबई.राठी : अे/३०३, आशियान अपार्टमेंट, एल.बी.स.मार्ग,फौजिया हॉस्पीटल जवळ, कुर्ला (पश्चिम), मुंबई-७०.मो. क्र. ९८९२४१३२५१ असे सांगितले.

त्यानंतर आरटीओ ऑफिस जवळील विलास रेस्टॉरंट व बार मधील पाठीमागील रूममध्ये यातिल दोन्ही आरोपीतांना घेवुन गेलो. तेथे शासकिय मोबाईलमध्ये व्हिडीओ चित्रीकरण सुरु करून, रूम मधील दिवे बंद करून ,दोन पंचासमक्ष आरोपी राजेंद्रप्रसाद बिंद याचे हाताची अल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाशात तपासणी केली असता राजेंद्रप्रसाद याचे उजव्या हाताचे पेरांना अँन्थ्रोसीन पावडरची फिकट निळसर चकाकी दिसून आली. तसेच पँटचे उजव्या खिशावर अँन्थ्रोसीन पावडरची फिकट निळसर चकाकी दिसून आली. आरोपी राजेंद्रप्रसाद याचेकडुन हस्तगत रक्कम रूपये ३५००/- रू वर अँन्थ्रोसीन पावडरची फिकट निळसर चकाकी दिसून आली. लाच रक्कमेच्या नोंटावरील नंम्बर पडताळुन पाहिले असता ते सापळा कारवाई कामी वापरण्यात आलेल्या नोटांचेच असल्याचे दिसुन आले. तसेच तक्रारदार यांची अल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाशात तपासणी केली असता तक्रारदार यांच्या हातास व कुडताच्या उजव्या खिशास खिशावर अँन्थ्रोसीन पावडरची फिकट निळसर चकाकी दिसून आली. उर्वरीत कार्यवाहीकरीता आम्ही सर्व ताब्यात घेतलेल्या अंगझडतीतील चिजवस्तू व दोन्ही खाजगी इसम आरोपी यांचे सह लाप्रवि कार्यालयात परत आलो व सापळा कारवाईबाबत सविस्तर सापळापुर्व व सापळा पंचनामा तयार करण्यात आला.

यातील तक्रारदार मोहम्मद आलमगिर अन्सारी यांचे आरटीओ अंधेरी कार्यालय येथे ब्लॉक करून जमा असलेले ड्रायव्हिंग लायसनवरचे ब्लॉक काढण्यासाठी यातील आरटीओ एजंट खाजगी आरोपी इसम क्रमांक ०१ नामे मुस्तफा नुरमोहम्मद शेलॉट याने दिनांक १२/०६/२०२६ रोजी रू. ४,०००/- व लायसन्स रिनिव्हल करीता रू. ५,५००/- अशी अधिकृत फि व्यतिरिक्त जास्तीचा बेकायदेशीर लाच रक्कमेची मागणी केली. त्यानंतर पंचासमक्ष पडताळणी वेळी आरटीओ येथील लायसन वरील ब्लॉक काढण्यासाठी तडजोडी अंती रू. ३,५००/- स्वीकारण्याचे कबुल करून आरटीओ अधिकाऱ्याकडून काम करून देण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर दिनांक १५/०६/२०२६ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान दुसरा आरटीओ एजंट खाजगी आरोपी क्रमांक ०२ श्री.राजेंद्रप्रसाद रमाशंकर बिंद यांने खाजगी आरोपी क्रमांक ०१ नामे मुशतफा नुरमोहम्मद शेलॉट यांच्या सांगण्यावरुन तक्रारदार मोहम्मद आलमगिर अन्सारी यांचेकडील रू. ३,५००/- लाच रक्कम पंचासमक्ष स्वीकारली म्हणून भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ कलम ७(अ), १२ अन्वये गुन्हा नोंद करण्याकरिता फिर्याद आहे.

माझा वरील जबाब माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत करण्यात आला असुन तो मि वाचुन पाहिला असता माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

(हरिदास किल्लेदार)
सहायक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with OKEN Scanner

राने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ निरंक

ons for delay in reporting by the complainant/informant

गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

iculars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

........................................................................

चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........................................

Total Value of properties stolen / involved

चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

स्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........................................

natural / Accidental Death Case No., if any.

ल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

rst Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

रदार मोहम्मद आलमगिर अंसारी यांचे RTO येथे ब्लॉक करून जमा असलेले ड्रायव्हिंग लायसनचे ब्लॉक काढण्यासाठी तिक RTO एजंट खाजगी आरोपी क्र.1 याने 4000रु. व लायसन रिलिजसाठी 5500रु. असे अधिकृत फि ाशिरिक्त जास्तीच्या बेकायदेशीर लाच रकमेची मागणी केली. त्यानंतर पंचासमक्ष पडताळणी केली RTO येथील ायसनवरील ब्लॉक काढण्यासाठी तडजोडीअंती 3500रु. स्विकारण्याचे कबुल करून RTO अधिकाऱ्याकडून काम करुन त्याचे आश्वासन दिले. सापळा कारवाई दरम्यान खाजगी आरोपी क्र.1 याचे सांगणेवरून दुसरा RTO एजंट खाजगी ारोपी क्र.2 याने तक्रारदार यांचेकडील 3500रु. लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली असता, त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. म्हणून भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम 7(अ), 12 अन्वये गुन्हा नोंद

**केलेली कार्यवाही** -1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या

तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : मच्छिंद्र गिरजाबा दिवे, सपोआ, ला.प्र.वि. मुंबई.

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ........................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ................ जिल्हा ........ राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .............. Rank .............. No. ............
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........................................

(3) Transferred to P. S. ..............................
District .............................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही
Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ........ हरिदास किल्लेदार
पदनाम Rank ........ सहायक पोलीस आयुक्त
तपासिक अ. चा कोड क्र. ........ ला.प्र.वि. मुंबई.
Posting
Code No. of I. O. ........................................

5. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ........................................
1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत<br>Copy to | 2 फिर्यादी,<br>2. Complainant, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक),<br>3. Supdt. of Police (Computer), | 4. तपासिक अंमलदार,<br>4. Inv. Officer, | 5. स्थळ प्रत.<br>5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with OKEN Scanner